**महाराष्ट्र शासन**

**पोलीस अधीक्षक कार्यालय बीड**

जिल्हा शासकिय रुग्णालयाजवळ बार्शी रोड बीड -431122

**फोन :** 02442-222333. **फॅक्स :** 02442-221333 **ई-मेल :** sp.beed@mahapolice.gov.in


जा.क्र.प्रलि-आस्था/पो.भरती/अंतिम उत्तर तालिका/2026/ बीड, दिनांक 18.03.2026

**पोलीस भरती सन 2024-25 च्या दिनांक 15/03/2026 रोजी आयोजित करण्यांत आलेल्या लेखी परीक्षेचे अंतिम उत्तरतालिका बाबत.**

--00--

बीड जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील सन 2024-25 मध्ये रिक्त असणाऱ्या पोलीस शिपाई भरतीसाठी दिनांक 15/03/2026 रोजी 11.00 ते 12.30 वा. दरम्यान लेखी परिक्षा करीता पात्र उमदेवार यांची लेखी परिक्षा आदित्य इंजिनिअरिंग कॉलेज, तेलगांव नाका बीड येथे आयोजित करण्यांत आलेली होती. सदरचे लेखी परिक्षेचे तात्पुरती उत्तरतालिका दिनांक 15/03/2026 रोजी प्रकाशित करण्यांत येवून दिनां 16/03/2026 रोजी पावेतो आक्षेप सादर करणे बाबत कळविण्यांत आलेले होते.

उमेदवार यांचेकडून प्राप्त आक्षेप, सूचना, हरकती व त्या संबंधाने सादर केलेले पुरावे याचा सारासार विचार करुन दिनांक 17/03/2026 रोजी अंतिम उत्तरतालिका प्रकाशित करण्यांत आलेले आहे. अंतिम उत्तरतालिका मध्ये # या चिन्हाने दर्शविण्यांत आलेले प्रश्न रद्य करण्यांत आलेले आहेत. अंतिम उत्तरपत्रिका प्रसिध्द केल्यानंतर सुध्दा विविध उमेदवार यांचेकडून दुरध्वनी, ईमेल व्दारे आक्षेप सादर करीत आहेत.

सर्व उमदेवार यांना सूचित करण्यांत येते की, तात्पुरती उत्तरतालिका प्रसिध्द केल्यानंतर प्राप्त झालेले आक्षेपाचा सारासार विचार करुन अंतिम उत्तरतालिका प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. त्यामुळे त्यानंतर प्राप्त झालेले कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**नवनीत कॉँवत ( भा.पो.से.)**

पोलीस अधीक्षक, बीड.

Scanned with OKEN Scanner